| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ३७ वा | शनिवार दिनांक ११ एप्रिल, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### गळ्यातील सोन्याची चैन येरमाळ्यातून चोरी

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी तेजस चंद्रकांत मोटे, वय ३० वर्षे, रा. अंबर हाईटस रो हाउस नं के २ ग्रीन सिटी जवळ अंबरनाथ पुर्व ता. अंबरनाथ जि. ठाणे यांचे गळ्यातील सोन्याची चैन अंदाजे ८५,००० किंमतीची अज्ञात व्यक्तीने चुन्याच्यारानात येरमाळा येथुन चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-तेजस मोटे यांनी दि.०८.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### लॅपटॉप व आदि वस्तूची चोरी

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी मनोहर बाळासाहेब जगताप, वय ३४ वर्षे, रा. बुवांचा मळा.पोस्ट साकुर्डे ता. इंदापुर जि.पुणे यांचे कार हिचे नुकसान करुन कंपनीने कामासाठी दिलेला सिल्व्हर रंगाचा सेट मेक अॅड मॉडेल एच पी इलाईट बुक ४४० जीएट, सेट टॅग ५ सीडी ३१० जेसीपीएच कंपनीचा लॅपटॉप अंदाजे ८०,००० किंमतीचा अज्ञात व्यक्तीने दि.०३.०४.२०२६ रोजी .चुन्याच्या रानात येरमाळा येथुन चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-मनोहर जगताप यांनी दि.०८.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथ गुन्हा नोंदवला आहे.

# महिलांनी विज्ञाननिष्ठ व बुद्धिनिष्ठ राहणे ही काळाची गरज- जि.प.अध्यक्षा अर्चना पाटील

धाराशिव,दि.१० एप्रिल (जिमाका) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे द्विशताब्दी वर्ष,संत गाडगे महाराज जयंतीचे १५० वे वर्ष तसेच महाड चवदार तळे सत्याग्रह शताब्दी वर्षानिमित्त 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह' ८ ते १४ एप्रिल २०२६ दरम्यान साजरा करण्यात येत आहे.या कालावधीत जिल्ह्यात विविध जनजागृतीपर कार्यक्रम,शिबिरे व विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशी,आज १० एप्रिल रोजी सामाजिक न्याय भवन, धाराशिव येथील सभागृहात महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात जिल्हा परिषद अध्यक्षा श्रीमती.अर्चना पाटील यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून झाली.

यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती.प्रियंवदा म्हाडदळकर, धाराशिव नगर परिषद नगराध्यक्षा श्रीमती. नेहा काकडे,समाज कल्याणचे सहायक आयुक्त सचिन कवले,महिला व आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वय अधिकारी सुखदेव चिंचोलकर,जिल्हा कोषागार अधिकारी श्रीमती.अर्चना नरवाडे,जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक अमोल बळे, व्याख्याते महेंद्र चंदनशिवे,प्रा.राजा जगताप,श्रीमती वनिता डोंगरे आदी मान्यवर उपस्थित होते.

महिला मेळाव्यात जिल्हाभरातील महिला व बचत गटांच्या सदस्यांना मार्गदर्शन करताना जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चना पाटील म्हणाल्या की,भारतीय संविधानाने महिलांना समानतेचा हक्क दिला असून आर्थिक अडचणींना खचून न जाता शासनाच्या विविध योजनांची माहिती घेऊन स्वयंरोजगार निर्माण करणे आवश्यक आहे.महिला बचत गटांच्या माध्यमातून विविध व्यवसाय सुरू करून जिल्ह्याचे नाव सर्वदूर पोहोचवावे,असे आवाहन त्यांनी केले.ग्रामीण भागातील महिलांनी अंधश्रद्धेला बळी न पडता विज्ञाननिष्ठ व बुद्धिनिष्ठ दृष्टिकोन स्वीकारणे ही आजची गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती.प्रियंवदा महाडदळकर यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की,भारतीय संविधानातून मिळालेल्या लोकशाही,समता व समानतेच्या हक्कांमुळे महिलांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली असून त्यातून नारीशक्ती अधिक सक्षम होत आहे.शिक्षणामुळे महिलांमध्ये आमूलाग्र परिवर्तन घडत असून त्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत आहेत.असे त्या म्हणाल्या.



महिला व आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक सुखदेव चिंचोळकर यांनी सांगितले की,माविमच्या माध्यमातून २००७ पासून महिला बचत गटांना आर्थिक साक्षरतेचे प्रशिक्षण दिले जात आहे.बचत गटांनी तयार केलेली उत्पादने मेझॉनसारख्या ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत.सेंद्रीय शेती,महिला आरोग्य, स्त्री-पुरुष समानता आणि जीवामृत या विषयांवर उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल ज्ञानदीप लोकसंचलित साधन केंद्र (उमरगा),समता लोकसंचलित साधन केंद्र (परंडा) आणि नवप्रभा लोकसंचलित साधन केंद्र (कळंब) या कार्यालयांना 'नवतेजस्विनी' प्रकल्पांतर्गत प्रत्येकी ५० हजार रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात आले.या पारितोषिकांचे धनादेश अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांच्या हस्ते वितरित करण्यात आले.याच कार्यक्रमात २०२५-२६ या वर्षात महिला व आर्थिक विकास महामंडळ,धाराशिव यांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल राज्यात द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याने विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी व्याख्याते महेंद्र चंदनशिवे, प्रा.राजा जगताप,जिल्हा कोषागार अधिकारी श्रीमती.अर्चना नरवाडे, नगराध्यक्षा श्रीमती. नेहा काकडे, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक अमोल बळे तसेच श्रीमती वनिता डोंगरे यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमास बचत गटांच्या महिला, नागरिक,विद्यार्थी,पत्रकार तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाज कल्याणचे सहायक आयुक्त सचिन कवले यांनी केले.

# 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' मोहिमेत धाराशिव अव्वल ठरणार जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांचा निर्धार




धाराशिव,दि.१० एप्रिल (जि.मा.का.) छत्रपती संभाजीनगर येथील मंथन सभागृह,एम.आय.टी.इंजिनीअरिंग कॉलेज येथे 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' या विभागीय प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यशाळेत तेरा जिल्ह्यांतील आरोग्य विभागाचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी तसेच ग्रामीण भागातील लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी होते.

कार्यक्रमाला सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट,उपमहापौर राजेंद्र जंजाळ, धाराशिव जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अर्चनाताई पाटील, उपाध्यक्षा वर्षाताई गायकवाड यांच्यासह सरपंच,पंचायत समिती सभापती व विविध लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले की,'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' हे केवळ अभियान नसून लोकसहभागातून उभी राहणारी व्यापक आरोग्य चळवळ आहे. या उपक्रमामुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलणार असून नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा घरपोच उपलब्ध होतील. उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपायांवर भर देणे हे या अभियानाचे वैशिष्ट्य आहे. गावागावांत जनजागृती करून तपासण्यांची संख्या वाढविणे अत्यंत आवश्यक आहे,असे सांगितले.

यावेळी बोलताना जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांनी धाराशिव जिल्हा पूर्णपणे 'आरोग्य संपन्न' करण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला. त्या म्हणाल्या,आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. शासनाच्या या उपक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्याचा सर्वांगीण कायापालट करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील प्रत्येक गावातील शेवटच्या घटकापर्यंत दर्जेदार आरोग्य सेवा पोहोचवणे हेच आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. असे त्या म्हणाल्या.

या अभियानात जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागासोबतच ग्रामविकास, महिला व बालकल्याण, शिक्षण तसेच इतर सर्व विभागांचा समन्वय साधला जाणार असून लोकसहभागातून ही चळवळ प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रशासनाला आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची ग्वाहीही त्यांनी दिली.


उपाध्यक्षा वर्षा गायकवाड यांनी आरोग्य कर्मचाऱ्यांच्या योगदानाचे कौतुक करताना ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांच्या माध्यमातून लसीकरण, माता-बाल संगोपन व स्वच्छता मोहिमेला अधिक गती देण्यात येणार असल्याचे सांगितले.

या कार्यशाळेस जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकुरकर,जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ.कुलदीप मिटकरी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवाजी फुलारी यांच्यासह सर्व तालुका आरोग्य अधिकारी,वरिष्ठ अधिकारी व आशा स्वयंसेविका उपस्थित होत्या.

### ग्रामपातळीवर आरोग्य क्रांतीचा संकल्प :

**कार्यशाळेत पुढील प्रमुख मुद्द्यांवर विशेष भर देण्यात आला -स्वच्छता व पाणी व्यवस्थापन, शुद्ध पाणीपुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थापनाद्वारे साथीच्या आजारांना प्रतिबंध. लोकसहभाग- ग्रामपंचायत व ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे.**

**शंभर टक्के लसीकरण- प्रत्येक बालक व गरोदर मातेचे वेळेत लसीकरण पूर्ण करणे,कुपोषण निर्मूलन - अंगणवाडी व आरोग्य विभागाच्या समन्वयातून कुपोषणमुक्त जिल्हा घडविणे.या सकारात्मक उपक्रमामुळे धाराशिव जिल्हा 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' अभियानात आरोग्य क्षेत्रात आदर्श निर्माण करेल,असा विश्वास जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास यांनी व्यक्त केला आहे.**



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## दीनदलित, कष्ठकऱ्याचे जीवन फुलवणारे "फुले"

महात्मा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी पुण्यातील काठजोडी गल्लीतील एका माळी कुटुंबात झाला. जोतीराव यांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. त्यांचे वडील गोविंदराव हे फुलांचे काम करणारे होते. लहानपणीच ज्योतिराव यांची आई जग सोडून गेली. वडिलांनी इंग्रजी शिक्षण घेण्यासाठी त्यांना स्कॉटिश मिशन स्कूलमध्ये पाठवले. तिथेच त्यांनी सामाजिक विषमतेचा सामना केला. बालपणापासूनच त्यांना समाजातील विषमता, जातीपातीचा भेद, स्त्रियांवरील अन्याय दिसून येत होता आणि ह्यामुळे त्यांच्या मनात त्या अन्यायाविरुद्ध लढण्याची ठिणगी पेटली. ज्योतिबा फुले यांचा सर्वात मोठा आणि ऐतिहासिक टप्पा म्हणजे स्त्री शिक्षणासाठी उचललेले पाऊल. त्यांना माहीत होते की, शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे मुख्य साधन आहे. यासाठी त्यांनी प्रथम आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना अक्षरओळख करून दिली आणि मग त्यांना शिक्षक म्हणून तयार केले. १८४८ मध्ये पुण्यात तात्यासाहेब भिडे यांच्या भिडे वाड्यात त्यांनी भारतातील पहिली मुलींची शाळा सुरू केली. त्या काळात स्त्रीशिक्षण हा पवित्र धर्मसंहितेच्या विरोधातील अपराध मानला जात असे. अशावेळी त्यांनी सामाजिक विरोध, शिव्याशाप, दगडधोंडे सहन करत, सावित्रीबाईंबरोबर शिक्षणाचा दिवा तेवत ठेवला. या क्रांतिकारक पावलाने स्त्रीशिक्षणाची दारे उघडली. त्या काळातील कट्टरपंथी समाजाच्या विरोधाला न जुमानता, फुले दाम्पत्याने शिक्षणाचा प्रसार केला, विधवांसाठी निवास संस्था उभारल्या, आणि अस्पृश्य समजल्या गेलेल्या वर्गासाठीही अनेक उपक्रम राबवले. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी १ जानेवारी १८४८ रोजी याच भिडे वाड्यात मुलींसाठी शाळा सुरू केली. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी १ जानेवारी १८४८ रोजी याच भिडे वाड्यात मुलींसाठी शाळा सुरू केली. महात्मा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाज स्थापन करून समाजातील खऱ्या अर्थाने 'सत्य' आणि 'समता' यांचा प्रचार सुरू केला. या समाजाच्या माध्यमातून त्यांनी ब्राह्मणवादी वर्चस्वाचा विरोध केला आणि शूद्र-अतिशूद्र, स्त्रिया यांना स्वाभिमानाने जगण्याचा संदेश दिला. सत्यशोधक समाज हे एक सामाजिक जागृतीचे केंद्र होते, ज्याचा उद्देश ब्राह्मणवाद, जातीय उच्चनीचता आणि अंधश्रद्धा यांचा पर्दाफाश करणे हा होता. त्यांनी धर्मगुरूंच्या वर्चस्वाला आव्हान दिले आणि सर्वसामान्य जनतेला सांगितले की, देव मंदिरात नाही, तर माणसाच्या सेवेत आहे. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून लग्न, उपनयन, अंत्यसंस्कार यांसारख्या धार्मिक विधींमध्ये पुजाऱ्यांची गरज नाही, हे ठासून सांगण्यात आले. त्यांनी स्वतः सत्यशोधक पद्धतीने विवाहसोहळे लावले. ज्योतिबा फुले यांनी आपला मुलगा यशवंत याचाही विवाह सत्यशोधक पद्धतीने लावला. आणि शेकडो समाजबांधवांना समतेचा, आत्मसन्मानाचा नवा मार्ग दाखवला. ज्योतिबा फुले हे फक्त एक विचारवंत नव्हते, तर कृतीशील नेतृत्वाचे प्रतीक होते. शेती, पाणीपुरवठा, सार्वजनिक आरोग्य, हेही त्यांच्या विचारांच्या केंद्रस्थानी होते. आजच्या आधुनिक भारतात, जिथे अजूनही जातीभेद, लिंगभेद दिसतो, तिथे फुले यांचे विचार म्हणजे अंधारात प्रकाश देणारा दीप आहे. त्यांची शिकवण, समाजदृष्टी आणि परिवर्तनाची तळमळ आजही तितकीच समर्पक आणि प्रेरणादायी आहे. महात्मा फुले यांचे कार्य केवळ कृतीशील नव्हते, तर ते विचारशील आणि साहित्यनिर्मितीच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणारे होते. त्यांच्या विचारसरणीत धर्म, जात, लिंग यावर आधारित कोणताही भेद नव्हता. त्यांनी सत्य, न्याय आणि समता या तत्त्वांचा पुरस्कार केला. शेतकऱ्यांच्या जीवानावर आधारित या ग्रंथाचे लेख फुले यांनी १८८३ मध्ये केले. शेतकऱ्यांच्या खालावलेल्या परिस्थितीचे प्रत्यक्ष अवलोकन करून आपल्यापरीने त्याची कारणमीमांसा फुले यांनी या ग्रंथात केली आहे. शेतकरी वर्गाचा जीवनक्रम आणि शेतीविषयक प्रश्न यांचे अतिशय सखोल चित्रण ज्योतिरावांनी या ग्रंथात केले आहे. विशेषत: मध्यम आणि कनिष्ठ शेतकऱ्यांची भीषण दुरावस्था कशामुळे निर्माण झाली आणि ती कोणत्या उपायांनी दूर होईल याचा विचार फुले यांनी या ग्रंथात केला आहे. १८७३ मध्ये लिहिलेल्या या ग्रंथात ज्योतिबा फुले यांनी अभिप्रेत असलेल्या मानव कल्याणाच्या धर्माची रूपरेषा मांडली आहे. मानवाने परस्परांशी आणि सभोवतालच्या विश्वाशी कसा व्यवहार केला म्हणजे त्यांचे जीवन आनंदमय होईल याचे सर्व मार्गदर्शन केल्या या ग्रंथात केले आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांनी मानवी जीवन सुखी होण्यासाठी या ग्रंथात मार्गदर्शन केल्यामुळे फुलेंचा हा ग्रंथ म्हणजे मानवमुक्तीचा महान संदेश देणारा ज्ञानकोशच आहे. हा त्यांचा ग्रंथ त्यांच्या मृत्यूनंतर इ.स. १८९१ मध्ये प्रकाशित झाला. संवाद रुपामध्ये केलेले गद्यलेखन आहे. धोंडिबा आणि ज्योतिराव यांच्यामधील हा संवाद असून धोंडिबा हिंदूच पौराणिक ग्रंथ, वेद, मंत्र, कर्मकांडे, इंद्राचे विविध अवतार, शोषणारी मिथके आणि मुक्तिदायी मिथके अशा गोष्टींशी संबंधित प्रश्न विचारतो आणि ज्योतिराव त्याच्या प्रश्नांची उत्तरे देत-देत शंकांचे निरसरनही करतात. त्या दोघांमधील संवाद हा केवळ भूतकाळातील प्रश्नांवर चाललेला दिसत नाही. तर वर्तमानकालीन प्रश्नांवर त्यांच्यामध्ये चर्चा होते. या ग्रंथाच्या पहिल्या नऊ भागात ब्राह्मणवर्गाने केलेल्या पारंपारिक शोषणाचे वर्णन येते. तर अखेरच्या सात भागात इंग्रजी राजवटीतील अत्याचारावर प्रकाश टाकलेला आहे. हजारो वर्षे परंपरेने चालत आलेल्या रूढी प्रथांमुळे स्त्री-शुद्रातिशुद्रांच्या वाट्याला जुलूम अत्याचार, पिळवणूक आणि वर्तमानकालीन इंग्रजी राजवटीतही त्यांची या गुलामगिरीतून सुटका झाली नाही. त्यामुळे या स्त्री-शुद्रांना शिक्षण देऊन त्यांची या गुलामगिरीतून सुटका करावी, असे आवाहन या पुस्तकातून महात्मा फुले राज्यकर्त्यांना करतात. माध्यमातून करतात. खऱ्या खुऱ्या स्वतंत्र भारताचे स्वप्न ज्यांनी बघितले, भारतीय समाज रचनेचा कायापालट करणारा एक महान क्रांतिसूर्य, भारतीय स्त्रियांसाठी साक्षात स्वातंत्र्यमूर्ती, अशी ओळख असणाऱ्या थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन. त्यांचे विचार, कार्य कदापी विसरता येणार नाहीत.

# सामाजिक क्रांतीचे दीपस्तंभ : महात्मा जोतीराव फुले

भारताच्या सामाजिक इतिहासात ११ एप्रिल हा दिवस केवळ एका महापुरुषाच्या जन्माचा दिवस नाही, तर समता, शिक्षण आणि मानवतेच्या नव्या युगाची सुरूवात करणारा दिवस आहे.महात्मा जोतीराव गोविंदराव फुले यांच्या जन्मामुळे भारतीय समाजव्यवस्थेला नवी दिशा मिळाली. सन १८२७ मध्ये जन्मलेल्या या युगपुरुषाच्या विचारांचा प्रकाश आजही समाजाच्या प्रत्येक स्तरावर जाणवतो. ११ एप्रिल पासून महात्मा ज्योतिबा फुले द्विशताब्दी जयंती वर्ष साजरे केले जाणार आहे. महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात द्विशताब्दी जयंती समिती स्थापन केली आहे.समाजातील समता, शिक्षण, स्त्री-सक्षमीकरणांचे विचार लोकांपर्यंत पोहोचविण्याचा राज्य सरकारने संकल्प केला आहे.त्यामुळे ११ एप्रिलचा दिवस भारताच्या सामाजिक समतेच्या तेजस्वी द्विशताब्दी पर्वाचा दिवस म्हणूनही देशात साजरा होत आहे.त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या कार्याचा पुनर्विचार करणे म्हणजे केवळ इतिहासाचे स्मरण नसून वर्तमानाला दिशा देण्याचे कार्य आहे.

**मानवतेचा धर्म : समतेचा मूलाधार**

महात्मा फुले यांच्या विचारविश्वाचा केंद्रबिंदू म्हणजे "मानव हा सर्वात मोठा धर्म आहे" ही भूमिका. त्यांनी धर्म, जात, पंथ यापलीकडे जाऊन माणुसकीचा विचार मांडला. त्यांच्या लेखनात आणि कृतीतून सतत दिसून येते की, समाजातील अन्याय आणि विषमता दूर केल्याशिवाय खरी प्रगती होऊ शकत नाही. त्यांनी मांडलेली समतेची संकल्पना ही केवळ तात्त्विक नव्हती, तर ती प्रत्यक्ष कृतीतून साकारलेली होती.

**शिक्षणाची ज्योत : अज्ञानातून मुक्तीचा मार्ग**

महात्मा फुले यांनी घेतलेला सर्वात क्रांतिकारी निर्णय म्हणजे शिक्षणाचा प्रसार. त्यांनी प्रथम स्वतःच्या पत्नीला सावित्रीबाई फुले यांना शिक्षित केले आणि त्यानंतर १८४८ मध्ये पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली. सावित्रीबाईंनीही समाजाच्या विरोधाला न जुमानता स्वतःला शिक्षणासाठी वाहून घेतले. शेण गोट्याचा मार सहन करत सावित्रीबाईंनी स्त्री शिक्षणाचा पाया रचला. जोतीबा आणि सावित्री या दांपत्याच्या त्या काळातील सामाजिक बंडामुळे शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली.त्या काळात स्त्रीशिक्षणाला तीव्र विरोध असतानाही त्यांनी मागे हटणे स्वीकारले नाही. शिक्षण हेच शोषणाविरुद्धचे सर्वात प्रभावी शस्त्र आहे, ही त्यांची धारणा होती. या कार्यातून त्यांनी समाजातील अज्ञानाची बेडी तोडण्याचा प्रयत्न केला.अविद्या हेच शोषणाचे मुख्य कारण आहे हे सांगताना त्यांनी समाजाला याबाबतचा कठोर संदेश दिला...

**विद्येविना मती गेली**
**मतीविना नीती गेली**
**नितीविना गती गेली**
**गती विना वित्त गेले**
**वित्तविना शूद्र खचले**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले...**

**अन्यायाविरुद्ध बंड**

त्या काळातील समाज रुढी-परंपरांच्या कठोर बंधनात अडकलेला होता. बालविवाह, सतीप्रथा, स्त्रीदास्य आणि अस्पृश्यता यांसारख्या प्रथांनी समाजाला जखडून ठेवले होते. महात्मा फुले यांनी या सर्व प्रथांविरुद्ध उघडपणे आवाज उठवला. त्यांनी विधवांसाठी आश्रयस्थळे उभारली, विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले आणि स्त्रियांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देण्यासाठी संघर्ष केला. त्यांच्या कृतीतून समाजातील महिलांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा मिळाली.



**सत्यशोधकांचा मार्ग : समतेची संघटित चळवळ**

सन १८७३ मध्ये त्यांनी स्थापन केलेला सत्यशोधक समाज हा भारतीय सामाजिक इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला.या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी जातीभेद,अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांविरुद्ध संघटित लढा उभारला. सत्यशोधक समाजाने समाजाला विचार करण्याची नवी दिशा दिली. ज्यामध्ये सत्य, समता आणि बंधुता यांना केंद्रस्थानी ठेवले आहे.सत्यशोधक समाजाच्या मार्फत त्यांनी एक समांतर विज्ञानवादी भूमिका समाजापुढे मांडली.तत्कालीन ब्राह्मण्यवादाला झुगारून नव्या चालीरीती समाजाला दिल्या.

**शेतकऱ्यांचा आवाज : अन्यायाविरुद्धचा प्रहार**

महात्मा फुले यांनी केवळ सामाजिकच नव्हे, तर आर्थिक विषमतेवरही भाष्य केले. त्यांच्या "शेतकऱ्यांचा आसूड" या ग्रंथात त्यांनी शेतकऱ्यांच्या दुःखाचे अत्यंत वास्तव चित्रण केले आहे. महसूल व्यवस्थेतील अन्याय, सावकारशाहीचे शोषण आणि प्रशासनातील दुर्लक्ष यावर त्यांनी कठोर टीका केली. शेतकरी हा समाजाचा कणा असूनही त्याचे जीवन दारिद्र्यात का अडकले आहे, हा प्रश्न त्यांनी समाजासमोर उभा केला.

**लेखनातून घडवलेले परिवर्तन**

महात्मा फुले हे केवळ कृतीशील समाजसुधारक नव्हते, तर प्रभावी लेखकही होते. "गुलामगिरी" या ग्रंथातून त्यांनी जातीव्यवस्थेवर प्रखर प्रहार केला, तर "सार्वजनिक सत्यधर्म" मधून मानवतावादी धर्माची संकल्पना मांडली. त्यांच्या लेखनातून समाजाच्या डोळ्यांत अंजन घालण्याचे कार्य झाले. यातून त्यांच्या विचारांची व्यापकता स्पष्ट होते.याशिवाय त्यांनी गुलामगिरी,शेतकऱ्यांचा आसूड,ब्राह्मणांचे कसब, तृतीय रत्न,सार्वजनिक सत्य धर्म,छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील पोवाडा लिहून शिवरायांच्या कार्यकर्तुत्वाची ओळख करून दिली.रायगडावरील छत्रपती शिवरायांच्या समाधीची स्वच्छता केली. शिवाजी महाराजांच्या स्मृती पुनरुज्जीवनाच्या प्रारंभीच्या प्रयत्नांपैकी एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व त्यांना मानले जाते.

**सार्वजनिक जीवनातील योगदान**

महात्मा फुले यांनी सार्वजनिक जीवनातही सक्रिय सहभाग घेतला. पुणे महानगरपालिकेच्या कार्यातून त्यांनी नागरी प्रश्नांवर काम केले. पाणीपुरवठा, स्वच्छता आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे त्यांनी लक्ष दिले. त्यांनी ब्रिटिश प्रशासनाशी संवाद साधून सामाजिक प्रश्न मांडले आणि वंचित घटकांसाठी न्यायाची मागणी केली. शासन कोणतेही असो, ते न्याय्य आणि लोकहितकारी असले पाहिजे, ही त्यांची भूमिका होती.हंटर शिक्षण आयोगाकडे त्यांनी निवेदन सादर केले.सार्वत्रिक शिक्षणाचा पुरस्कार केला.

**सामाजिक सुधारणा स्वीकारल्या**

इंग्रजांच्या काही सामाजिक सुधारणांना स्वीकारताना त्यांनी इंग्रजांच्या अन्यायकारक नीतीवर सडकून टीका केली. एवढेच काय इंग्रजांना समजेल अशा भाषेत त्यांनी त्याची उत्तरे दिली. कोणताही पहिला प्रयोग स्वतःच्या घरी, स्वतःच्या कुटुंबावर करून बोले तैसा चाले ,त्याची वंदावी पाऊले, असा आदर्श त्यांनी समाजामध्ये निर्माण केला आहे. स्वतःच्या पत्नीला शिकवले. स्वतःची विहिर मागास वर्गीयांसाठी खुली केली. ब्राह्मण्यवादाचा आयुष्यभर विरोध करुनही त्यांनी एका ब्राह्मण विधवेच्या मुलाला दत्तक घेऊन समाजापुढे आदर्श निर्माण केला.त्या मुलाचे आंतरजातीय लग्न लावून देण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला. महात्मा जोतीबा फुले यांनी घेतलेले निर्णय अशा प्रकारे कायम प्रेरणादायी आहेत. महात्मा ज्योतिबा फुले हे स्वतःच्या मुलाचा आंतरजातीय विवाह करणारे पहिले पालक ठरले आहेत. काळाची पावले ओळखून नवनव्या प्रयोगाद्वारे सामाजिक सुधारणा करण्यात भारतातल्या सर्व सामाजिक सुधारणा करणाऱ्या थोर पुरुषांमध्ये त्यामुळे महात्मा जोतीबा फुले वेगळे ठरले आहेत.

**यशस्वी व्यावसायिक**

सामाजिक कार्य, संघटना सुरु ठेवण्यासाठी आर्थिक स्त्रोत मजबूत असणे आवश्यक असते. त्यासाठी अंगी व्यावसायिक कसब बाळगणे खूप गरजेचे असते. संघटना, चळवळी, सुधारणांचा डोलारा चालविण्यासाठी पैशाची गरज असते. त्यासाठी आदर्श पद्धतीने व्यवसाय करुन स्वयंपूर्ण होणे गरजेचे असल्याचे महात्मा ज्योतिबा फुले यांनी सोदाहरणासह मांडून ठेवले. त्यांनी कंत्राटदार म्हणून अतिशय उत्तमपणे काम केले. आजही त्यांच्या सहभागात तयार झालेल्या वास्तू प्रेरक आहेत. पूल, धरणे, कालवे या बांधकामात कंत्राटदार म्हणून त्यांनी काम केले.

**आजच्या काळातील प्रासंगिकता**

महात्मा जोतीबा फुले यांच्या कार्याला दीडशे वर्षांहून अधिक काळ लोटला असला तरी त्यांच्या विचारांची प्रासंगिकता आजही तितकीच आहे. शिक्षणातील विषमता, सामाजिक भेदभाव आणि स्त्रीसमानतेचे प्रश्न अद्यापही पूर्णतः संपलेले नाहीत. त्यामुळे त्यांच्या विचारांचा प्रसार आणि आचरण करणे ही काळाची गरज आहे. त्यांच्या कार्याचा अभ्यास केल्यास समाजपरिवर्तनासाठी आवश्यक असलेली दृष्टी मिळते.

**जोतीराव परिवर्तनाची अखंड प्रेरणा**

महात्मा ज्योतिराव फुले हे एक व्यक्तिमत्त्व नसून एक चळवळ, एक विचारधारा आणि एक प्रेरणास्त्रोत आहेत. त्यांच्या कार्यातून राजर्षि छत्रपती शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रेरणा घेतली.त्यांच्या कार्यामुळेच महाराष्ट्राला फुलेशाहूआंबेडकरांचा महाराष्ट्र ही ओळख प्राप्त झाली आहे. त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त त्यांच्या विचारांचे स्मरण करणे म्हणजे केवळ आदर व्यक्त करणे नव्हे, तर त्या मूल्यांना आपल्या जीवनात रुजवण्याचा संकल्प करणे होय.

महाराष्ट्र शासनाने यासंदर्भात विशेष समिती स्थापन केली असून वर्षभर महात्मा जोतीबा फुले यांच्या जीवनकार्याला साजेशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यांच्या विचारांचा प्रसार करून सामाजिक समतेचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचा हा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न ठरणार आहे.

**प्रवीण टाके**
**उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर**
**९७०२८५८७७७**

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष पुढाकाराने
# बालकांच्या असंसर्गजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रणासाठी सामंजस्य करार

**मुंबई/प्रतिनिधी :** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष पुढाकाराने राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या दिशेने राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने बालकांमधील असंसर्गजन्य आजारांवर (एनसीडी) प्रभावी नियंत्रणासाठी नागपूर येथील एम्स, बालरोग विभागासोबत महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (एमओयू) केला आहे.

कराराच्या माध्यमातून बालकांसाठी अधिक सुरक्षित, निरोगी आणि समर्थ वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने ठोस पाऊल

या सामंजस्य कराराबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, बालकांचे आरोग्य हे राज्याच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. असंसर्गजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रण मिळविणे ही केवळ आरोग्य क्षेत्राची जबाबदारी नसून समाजाची एकत्रित बांधिलकी आहे. या कराराच्या माध्यमातून आपण मुलांसाठी अधिक सुरक्षित, निरोगी आणि समर्थ वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने एक ठोस पाऊल टाकत आहोत.

हा करार नागपूर येथील एम्स, बालरोग विभागासोबत करण्यात आला असून, या अंतर्गत राज्यातील जिल्हा रुग्णालयांमध्ये चाइल्डहुड एनसीडी क्लिनिक्स स्थापन व कार्यान्वित करण्यात येणार आहेत. या




उपक्रमातून टाईप-१ मधुमेह, जन्मजात हृदयरोग, दमा, स्थूलता, सिकलसेल, मानसिक आरोग्य आणि विकासात्मक विकार यांसारख्या आजारांचे प्रतिबंध, लवकर निदान आणि प्रभावी उपचार सुनिश्चित करण्यात येणार आहेत. तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, मानकीकृत उपचार पद्धती, डेटा संकलन प्रणाली आणि तज्ज्ञ मार्गदर्शन यावर विशेष भर दिला जाणार आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुढाकारातून करण्यात आलेले हा सामंजस्य करार पुढील तीन वर्षांसाठी कार्यान्वित असणार आहे. या करारांमुळे राज्यातील आरोग्य व्यवस्थेत गुणवत्ता, उपलब्धता आणि सर्वसमावेशकता वाढवण्यास मोठी चालना मिळणार आहे.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान संचालक डॉ. कादंबरी बलकवडे, उपसचिव विलास बेंद्रे तसेच डॉ प्रशांत जोशी, एम्स नागपूरचे कार्यकारी संचालक, डॉ मीनाक्षी गिरीश, बालरोग तज्ज्ञ यावेळी उपस्थित होते. एम्स, नागपूर संस्थेचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत हा करार करण्यात आला.

# महात्मा ज्योतिबा फुले : सामाजिक क्रांतीचे शिल्पकार

ज्योतिबा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे एका माळी समाजातील कुटुंबात झाला. त्यांच्या बालपणातच समाजातील जातीय भेदभाव आणि अन्याय यांचा अनुभव त्यांना आला. शिक्षण घेत असताना त्यांना उच्चवर्णीयांकडून होणारा अपमान सहन करावा लागला, आणि याच अनुभवांनी त्यांच्या मनात बंडखोरीची आणि परिवर्तनाची ज्योत पेटवली.

**शिक्षणासाठी क्रांतिकारी पाऊल :-**

त्या काळात स्त्रिया आणि दलित वर्गासाठी शिक्षण घेणे जवळजवळ अशक्य होते. परंतु फुले यांनी या अन्यायकारक प्रथेला धैर्याने आव्हान दिले. त्यांनी आपल्या सहचारिणी सावित्रीबाई फुले यांच्या मदतीने १८४८ मध्ये मुलींसाठी भारतातील पहिली शाळा सुरू केली. सावित्रीबाई फुले या स्वतः भारतातील पहिल्या महिला शिक्षिका बनल्या.

फुले दांपत्याने समाजातील वंचित घटकांसाठी शिक्षणाची दारे खुली केली आणि शिक्षण हेच खरे मुक्तीचे साधन हा संदेश दिला.

**सामाजिक समतेसाठी लढा :-**

ज्योतिबा फुले यांनी जातिव्यवस्था, अस्पृश्यता आणि धार्मिक अंधश्रद्धा याविरुद्ध कठोर संघर्ष केला. त्यांनी १८७३ मध्ये सत्यशोधक समाज ची स्थापना केली. या संस्थेचा मुख्य उद्देश होता-सत्याचा शोध घेणे आणि समाजातील सर्व घटकांना समान हक्क मिळवून देणे.

त्यांनी विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले, बालविवाहाचा विरोध केला आणि स्त्रियांच्या हक्कांसाठी आवाज उठवला. त्यांनी अनाथ आणि विधवांसाठी आश्रयस्थानही सुरू केले.

**साहित्य आणि विचारधारा :-**

फुले हे केवळ समाजसुधारकच नव्हते, तर ते एक प्रभावी लेखक आणि विचारवंतही होते. त्यांच्या र्ड्ढश्ररासळीळ या प्रसिद्ध ग्रंथात त्यांनी ब्राह्मणवादी व्यवस्थेवर कठोर टीका केली आणि समाजातील विषमतेचे वास्तव मांडले.

त्यांच्या लेखनातून समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश मिळतो. त्यांनी लोकांना विचार करायला शिकवले आणि अंधश्रद्धेविरुद्ध जागृती केली.

**आजच्या काळातील महत्त्व :-**

आजच्या आधुनिक युगातही ज्योतिबा फुले यांचे विचार अत्यंत सुसंगत आहेत. शिक्षणाचा प्रसार, स्त्री-सशक्तीकरण, सामाजिक न्याय आणि समानता या क्षेत्रांत त्यांनी दाखवलेला मार्ग आजही प्रेरणादायी आहे.

भारतातील अनेक सामाजिक चळवळींना त्यांच्या विचारांचा आधार मिळाला आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजात बदलाची पायाभरणी झाली आणि लोकशाही मूल्ये बळकट झाली.

**निष्कर्ष :-**



महात्मा ज्योतिबा फुले हे खरे अर्थाने सामाजिक क्रांतीचे जनक होते. त्यांनी समाजातील दुर्बल घटकांसाठी आयुष्यभर संघर्ष केला आणि समानतेचा संदेश दिला. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या कार्याची आठवण ठेवून, त्यांच्या विचारांचे अनुसरण करण्याचा संकल्प करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**-श्रीकांत चंद्रकांत देशमुख**
**जिल्हा माहिती कार्यालय,हिंगोली**

oooooooooooooooooooooo

# नारी शक्ती वंदन सुरक्षित मातृत्व हा प्रत्येक महिलेचा अधिकार

महिलांच्या सर्वांगीण विकासासोबतच सुरक्षित मातृत्व मिळावे यासाठी प्रधानमंत्री मातृवंदन योजना महिलांमध्ये लोकप्रिय होत आहे. गर्भवती महिला व स्तनदा मातांना सकस आहार घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यासोबतच काम करणाऱ्या महिलांना वेतनातील नुकसानभरपाई मिळत असल्यामुळे राज्यात सुमारे ५ लाख ७० हजारांपेक्षा जास्त महिलांनी या योजनेसाठी नोंदणी केली आहे. या योजनेमुळे मातामृत्यू तसेच बालमृत्यूचे प्रमाण कमी होण्यास मदत होत आहे. नागपूर विभागात या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत असून नागपूर जिल्ह्यात १८ हजार २६२ महिलांनी या योजनेत नोंदणी केली आहे.

प्रधानमंत्री मातृवंदन योजनेच्या माध्यमातून गर्भवती माता आणि बालकांच्या सुदृढ आरोग्यासाठी लाभार्थी महिलेला आर्थिक मदत देण्यात येत आहे. शहरी तसेच ग्रामीण भागामध्ये सुरक्षित मातृत्व मिळावे तसेच महिलेच्या बाळंतपणामध्ये होणाऱ्या आर्थिक व वैद्यकीय अडचणींचा सामना करता यावा यासाठी पहिल्या अपत्याच्या जन्मावेळी ५ हजार रुपये तसेच दुसऱ्या मुलीच्या जन्मावेळी ६ हजार रुपये थेट बँक खात्यात जमा करण्यात येतात. ही योजना गर्भवती माता आणि बालकांच्या सुदृढ आरोग्यासाठी वरदान ठरत आहे.

केंद्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागामार्फत प्रधानमंत्री मातृवंदन योजना राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेमुळे मातामृत्यू दर कमी होण्यासोबतच बालमृत्यू दरात लक्षणीय घट झाली आहे. गर्भवती मातेला दैनंदिन मजुरी करावी लागू नये तसेच मजुरीमुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीची भरपाई देण्यासाठी या योजनेत तरतूद करण्यात आली आहे. यामुळे मातेला विश्रांती घेण्यास प्रोत्साहन मिळते. त्यासोबतच दवाखान्यात प्रसूती आणि बालकांचे वेळेवर लसीकरण होत आहे. या योजनेसाठी लाभार्थी मातेचे आधार कार्ड आणि बँक खाते आधारशी लिंक असणे आवश्यक आहे. या योजनेच्या लाभासाठी लाभार्थ्यांचे उत्पन्न मर्यादा ८ लाख रुपये असणे आवश्यक आहे. ही संपूर्ण योजना ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येत आहे.

प्रधानमंत्री मातृवंदन योजना महिलांसाठी वरदान ठरत असून राज्यात ४२ लाख ९९ हजार महिलांना प्रत्यक्ष लाभ मिळाला आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत १ हजार ९३३ कोटी ९७ लाख रुपये पात्र लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात आले आहेत. या योजनेअंतर्गत ५ लाख ७० हजार नोंदणीचे लक्ष देण्यात आले होते, त्यापैकी २८ हजार १७४ पात्र महिला लाभार्थ्यांची नोंदणी पूर्ण झाली आहे. नागपूर विभागात दिलेल्या उद्दिष्टांमध्ये नागपूर जिल्ह्यासाठी १८ हजार २६२ लाभार्थ्यांच्या नोंदणीचे उद्दिष्ट देण्यात आले होते, त्यापैकी १६ हजार २२० लाभार्थ्यांची नोंदणी झाली असून १५ हजार १६९ महिलांना या योजनेचा थेट लाभ मिळाला आहे. १ एप्रिलपासून नव्याने ७८९ नवीन लाभार्थ्यांची नोंदणी झाली आहे.

प्रधानमंत्री मातृवंदन योजनेच्या लाभासाठी १८ ते ५५ वयोगटातील महिला पात्र आहेत. यामध्ये वार्षिक ८ लाख रुपयांची कौटुंबिक उत्पन्न मर्यादा आहे. अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गासाठी उत्पन्नाची अट नाही. प्रधानमंत्री आवास योजना, बीपीएल शिधापत्रिकाधारक, ई-श्रम कार्डधारक, मनरेगा जॉब कार्डधारक, गर्भवती व स्तनपान करणाऱ्या माता, अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस अथवा आशा कार्यकर्त्या तसेच अन्नसुरक्षा कायद्याअंतर्गत असलेल्या रेशनकार्ड धारकांना या योजनेचा लाभ मिळतो. या योजनेच्या लाभासाठी राज्य अथवा केंद्र शासनाच्या तसेच खाजगी आरोग्य केंद्रात गर्भधारणेची नोंदणी आवश्यक आहे. शेवटच्या मासिक पाळीच्या तारखेपासून ६ महिन्यांच्या आत किमान एक प्रसूतीपूर्व तपासणी झाल्यास ३ हजार रुपयांचा पहिला हप्ता दिला जातो. बाळाची जन्मनोंदणी तसेच लसीकरणाचे प्राथमिक चक्र पूर्ण झाल्यानंतर २ हजार रुपयांचा दुसरा हप्ता दिला जातो. दुसरे अपत्य मुलगी असल्यास एकाच टप्प्यात ६ हजार रुपये थेट बँक खात्यात जमा केले जातात.

प्रधानमंत्री मातृवंदन योजना पूर्वी आरोग्य विभागातर्फे राबविण्यात येत होती, परंतु एप्रिल २०२३ पासून मिशन शक्ती मार्गदर्शक सूचनांनुसार नव्याने लागू करण्यात आली आहे. ही योजना आता महिला व बाल विकास विभागातर्फे राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत २०२३-२४ या वर्षात ३ लाख ६२ हजार २१५ लाभार्थ्यांची नोंदणी झाली असून पात्र लाभार्थ्यांना थेट निधीचे वितरण करण्यात आले आहे.

**- अनिल गडेकर**

# थकलेली माणसं



विजय तरवडे

गेल्या आठवड्यात दिनांक ११ एप्रिल रोजी सर्वत्र जागतिक पार्किन्सन्स दिन साजरा झाला. या दिवशी पार्किन्सन्स झा-लेले, त्यातून सावरलेले रुग्ण, डॉक्टर्स आणि समाजातील सेवाभावी लोक गेटटुगेदर किंवा तत्सम प्रकारे प्रत्यक्ष एकत्र येतात. माहितीची आणि अनुभवांची देवाणघेवाण करतात. त्या निमित्ताने सर्वसामान्य लोकात या आजाराविषयी जनजागृती होते. एरव्हीही असे अनेकजण एकमेकांना मदत-मार्गदर्शन करीत असतातच. पार्किन्सन्स हा असा किती गंभीर आजार आहे? याबद्दलची समग्र माहिती एका लेखात मावणार नाही. याचा शोध, इतिहास, कारणे, लक्षणे, उपाय आणि त्याच्यासह जगण्यासाठी आवश्यक असलेली जीवनशैली हे अनेक पुस्तके भरतील असे विषय आहेत. या लेखात वाचकांना पार्किन्सन्सची तोंडओळख करून देऊन पुढील लेखात स्वतः सह काही परिचितांचे अनुभव आणि तपशील सांगणार आहे.

गेल्या काही वर्षात आपल्या परिचितांच्या वर्तुळात, नातलगांमध्ये किंवा स्वतः च्या कुटुंबात देखील पार्किन्सन्सची बाधा झालेले कोणी ना कोणी आढळू लागलेत. एखाद्या अवयवाची थरथर सुरू होणे, एकट्याने घराबाहेर पडता न येणे ही त्याची अगदी प्राथमिक लक्षणे झाली. इतक्या लोकांना होत अस-लेला हा आजर टाळता येईल का? टाळता न आला तर बरा होईल का? आणि रक्तदाब, अस्थमा, मधुमेहाप्रमाणे हा कधीच पूर्ण बरा होणार नसेल तर याच्यासह कसं जगायचं ? असे तीन प्रश्न अनेकांना पडतात.

जेम्स पार्किन्सन्स या डॉक्टरने विसाव्या शतकाच्या सुरुवातीला पार्किन्सन्सच्या लक्षणांची दखल आणि नोंद केली होती. पुढे त्यावर अधिक निरीक्षण आणि संशोधन होत गेले. आणि या विकाराला पार्किन्सन्स डिसीज उर्फ पीडी हे नाव देण्यात आले.

साधारणपणे साठीनंतर पुढील लक्षणे दिसू लागली तर सजग होण्याची आवश्यकता आहे - विश्रांतीच्या वेळी हात, पाय किंवा जबड्यात थरथर जाणवणे, मान सतत हलणे, हालचाली मंदावणे, उठण्या-बसण्यासारखी साधी कामे अवघड वाटणे, हात-पाय किंवा अन्य स्नायू कडक होणे, चालताना तोल जाणे किंव पडण्याची भीती वाटणे.

याखेरीज इतर तक्रारी अशा आहेत, की ज्या पार्किन्सन्समुळे उद्भवू शकतात किंवा पार्किन्सन्सशी संबंध नसलेल्या इतर कारणांनी उद्भवू शकतात - उदाहरणार्थ, कमी रक्तदाबाचा अनुभव - झोपलेल्या स्थितीतून बसताना किंवा बसलेल्या स्थितीतून उठताना कठीण जाणे; बध्दकोष्ठता; सतत निराश वाटणे, वास ओळखण्याची क्षमता घटणे, विश्रांतीनंतर देखील थकवा जाणवणे

या रोगाची कारणे विचारली तर तज्ज्ञ लोक सांगतील - मेंदूतल्या डोपामाईनची पातळी कमी होणे.

अशी लक्षणे जाणवली तर काय करायचे?

आधी फॅमिली डॉक्टर किंवा परिचयातील डॉक्टरला भेटून त्यांच्या सल्ल्याने रोगनिदानासाठी न्यूरोलॉजिस्टकडे जाणे. रोगनिदान झाले, की उपचारांना सुरुवात होऊ शकते. पार्किन्सन्सच्या उपचारात रुग्णाला न्यूरोलॉजिस्ट व्यतिरिक्त फ़िजिओथेरपिस्ट, सायकियाट्रीस्ट, परिचारिका, आहारतज्ज्ञ वगैरेंची मदत होऊ शकते.

पार्किन्सन्स पूर्णपणे बरा होतो का?

तर नाही; पण औषधोपचार आणि थेरपीजच्या साहाय्याने वरील लक्षणांवर नियंत्रण ठेवता येते. या लक्षणांसह त्रासासह आनंदाने जगण्याची जीवन शैली स्वीकारणे हाच मुख्य उपाय आहे. हा आजार बरोबर घेऊन आनंदाने जगणे कठीण आहे. पण त्याचा स्वीकार करण्याला पर्याय नाही. जगभर पार्किन्सन्सचे रुग्ण, डॉक्टर्स आणि सेवाभावी लोक एकत्र येऊन मदत-समूह किंवा सपोर्ट ग्रूप स्थापन करतात आणि एकमेकांना आधार देतात. कोणत्याही रोगाप्रमाणे याही रोगाच्या संदर्भात सतत संशोधन चालू असते आणि नवनवीन गुंतागुंती, नवनवीन औषधे यांची अद्ययावत माहिती पुढे येत असते. आपल्याकडेही असे मदत समूह आहेत. मराठी वाचकांसाठी 'पार्किन्सन्स मित्रमंडळ' या समूहाचे नाव सुचवावेसे वाटते. पार्किन्सन्सच्या क्षेत्रातील नामवंत डॉक्टर्स आणि इतर मान्यवर व्यक्ती याच्याशी निगडित आहेत. या समूहाने देखील ५ एप्रिल २०२६ रोजी पुण्यात एक चांगला प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित केला होता. त्या प्रसंगी प्रमुख पाहुणे जगदीश डॉक्टर हिरेमठ यांनी मार्गदर्शनपर व्याख्यान दिले होते. या समूहाशी फेसबुक, व्हॉटसएप, युट्यूबवर संपर्क साधणे शक्य आहे. ज्यांना ऑनलाइन माध्यमाचे वावडे आहे त्यांना समूहाशी पुण्यातल्या पत्त्यावर प्रत्यक्ष संपर्क साधता येईल. जिज्ञासू वाचकांना (याच समूहाने प्रकाशित केलेल्या) डॉ. क्षमा वळसंगकर यांच्या 'पार्किन्सन्सवर बोलू काही' आणि शेखर बर्वे यांच्या 'पार्किन्सन्सशी मैत्रीपूर्ण लढत' या पुस्तकांमध्ये बरीच अद्ययावत माहिती मिळू शकेल.

## देशात आता फक्त 'मेड इन इंडिया' सीसीटीव्ही

देशात सुरक्षा उपकरणांच्या क्षेत्रात मोठा बदल घडणार आहे. सरकारी निर्णयानुसार भारतात आता केवळ 'मेड इन इंडिया' सीसीटीव्ही कॅमेरेच विक्रीसाठी उपलब्ध राहतील. एक एप्रिलपासून प्रमाणित नसलेल्या विदेशी सीसीटीव्ही उत्पादनांच्या विक्रीवर पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. या निर्णयाकडे देशाच्या सुरक्षेला बळकटी देण्यासोबतच आत्मनिर्भरतेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल म्हणून पाहिले जात आहे.

सरकारने यापूर्वीच स्पष्ट केले होते, की 'एसटीक्यूसी' (स्टँडर्डायझेशन टेस्टिंग अँड क्वालिटी सर्टिफिकेशन) प्रमाणपत्र नसलेल्या ज्या सीसीटीव्ही कॅमेरां वितरकांना बाजारात विक्रीची परवानगी दिली जाणार नाही.


आयात केलेल्या उत्पादनांचा जुना साठा संपवण्यासाठी ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली होती. ही मुदत संपताच नवीन नियम लागू झाला आहे.

'एसटीक्यूसी' हा एक सरकारी दर्जा मानक आहे. तो कोणत्याही इलेक्ट्रॉनिक उत्पादनाची गुणवत्ता आणि सुरक्षा तपासतो. या प्रमाणनामुळे बाजारात विकले जाणारे सीसीटीव्ही कॅमेरे सुरक्षित, विश्वासार्ह आणि सायबर धोक्यांपासून संरक्षित असल्याची खात्री मिळते. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनेही हा निर्णय महत्त्वाचा मानला जातो. या निर्णयाचा सर्वाधिक परिणाम विदेशी कंपन्यांवर, विशेषतः चीनमधील उत्पादकांवर होणार आहे. अहवालानुसार 'हिकीव्हिजन' आणि 'टीपी-लिंक'सारख्या कंपन्यांना एसटीक्यूसी प्रमाणन मिळालेले नाही. त्यामुळे त्यांच्या उत्पादनांची विक्री भारतीय बाजारात होऊ शकणार नाही. यामुळे विदेशी कंपन्यांचे वर्चस्व कमी होण्याची शक्यता आहे. तथापि,



या बदलाचा परिणाम किमतींवरही दिसून येत आहे. व्यापार्यांच्या मते सीसीटीव्ही कॅमेर्यांच्या किमतीत १५ ते २० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे देशांतर्गत कंपन्यांना आता स्वतःची तंत्रज्ञान क्षमता विकसित करावी लागणार आहे. या निर्णयामुळे भारतीय कंपन्यांसाठी मोठी संधी निर्माण झाली आहे. स्थानिक उत्पादकांना आता समान स्पर्धेचे वातावरण मिळेल आणि त्यांच्या बाजारा-तील हिस्सेदारीमध्ये वाढ होण्याची अपेक्षा आहे. हा निर्णय 'आत्मनिर्भर भारत' या व्यापक धोरणालादेखील चालना देणारा ठरेल; मात्र, पुरवठ्याच्या बाबतीत काही आव्हानेही समोर येऊ शकतात. तज्ज्ञांच्या मते, भारतात सीसीटीव्ही कॅमेर्यांन मोठी मागणी आहे; पण सध्याची उत्पादनक्षमता मर्यादित आहे. देशांतर्गत उत्पादनातून अंदाजे पाच टक्के मागणीच पूर्ण होत आहे. त्यामुळे उद्योगाला जलद गतीने उत्पादन क्षमता वाढवावी लागेल.या निर्णयाचा परिणाम सामान्य ग्राहकांवरही होऊ शकतो. किमती वाढणे आणि पुरवठा मर्यादित असणे यामुळे विशेषतः लहान शहरांमध्ये आणि ग्रामीण भागात सीसीटीव्ही कॅमेरे महाग होण्याची शक्यता आहे; मात्र सरकारच्या मते, दीर्घकालीन दृष्टीने हा निर्णय अधिक सुरक्षित, गुणवत्तापूर्ण आणि विश्वासार्ह निगराणी प्रणाली निर्माण करण्यासाठी उपयुक्त ठरेल.

# महात्मा जोतिराव फुले जयंती: भारतीय सामाजिक क्रांतीचे जनक



११ एप्रिल रोजी साजरी केली जाणारी महात्मा फुले जयंती महाराष्ट्रात आणि भारतात मोठ्या उत्साहाने साजरी केली जाते. ज्योतिबा फुले (जन्म: ११ एप्रिल १८२७) हे थोर समाजसुधारक, जातिविरोधी विचारवंत, आणि स्त्री शिक्षणाचे प्रणेते होते. त्यांनी शिक्षणाद्वा-रे सामाजिक समानता आणि अस्पृश्यता निर्मूलनासाठी आयुष्य वेचले.

महात्मा फुले यांच्या कार्याची माहिती

स्त्री शिक्षण: सावित्रीबाई फुले यांच्यासोबत त्यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली.

सामाजिक सुधारणा: अस्पृश्यता आणि जातिव्यवस्थेच्या विरोधात लढा दिला. शिक्षण प्रसार: मागासवर्गीयांना शिक्षण मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

प्रमुख रचना: 'गुलामगिरी', 'शेतकऱ्याचा आसूड', 'सार्वजनिक सत्यधर्म' यांसारखे विचारप्रवर्तक ग्रंथ लिहिले.

महात्मा फुले यांचे विचार आजही प्रेरणादायी आहेत. त्यांचे विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले हे वाक्य शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करते. थोडक्यात सांगायचे तर

महात्मा फुले हे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार होते. त्यांची जयंती म्हणजे सामाजिक समतेचा आणि शिक्षणाचा उत्सव आहे समाजाचे दगड धोंडे आपल्या अंगावर घेत या राष्ट्राला शिक्षणाचे महत्त्व सांगितले, अशे थोर समाज सुधारक महात्मा जोतिबा फुले यांची आज जयंती आहे. साताऱ्यातील कटगुण या गावी ११ एप्रिल १८२७ रोजी जोतिबा फुले यांचा जन्म झाला. समाजाचे दगड धोंडे आपल्या अंगावर घेत या राष्ट्राला शिक्षणाचे महत्त्व सांगितले, अशे थोर समाज सुधारक महात्मा जोतिबा फुले यांची आज जयंती आहे. साताऱ्यातील कटगुण या गावी ११ एप्रिल १८२७ रोजी जोतिबा फुले यांचा जन्म झाला.

ज्योतिबांनी अनेक ग्रंथांचे लिखाण सुद्धा केलेले आहे, शेतकऱ्याचा असूड, ब्राम्हणांचे कसब, अश्या अनेक प्रकारच्या ग्रंथांमधून त्यांनी समाज प्रबोधन केले होते, प्रवाहाच्या विरुद्ध दिशेला तेच पोहू शकतात ज्यांचे निर्धार ठाम असतात, महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली; तेव्हा स्त्री विभागाचे नेतृत्व सावित्रीबाई यांनी केले. सावित्रीबाई यांच्याबरोबर १९ स्त्रियांनी सत्यशोधक समाजाचे कार्य सुरू केले. असे अमेक प्रगल्भ विचार त्यांनी मांडले असून, आजही या विचारांचा सन्मान करून ते आ-चरणात आणल्यास अनेक गोष्टिंनी काळाबरोबर आपण परिपक्व होऊ शकतो. आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी या विचारांचा नक्की फायदा होईल आणि उंच शिखर गाठणं सोपं होईल.

महात्मा जोतिबा फुले यांचे विचार जयंतीनिमित्त त्या महात्म्यास विनम्र अभिवादन.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



मुरुमं..फ हा शब्द ऐकल्यावर अनेकांच्या कपाळावर आठ्या येतात. इंटरनेटवर मॲक्नेफ अर्थात मुरमं, तारुण्यपिटिकांच्या समस्येबद्दलची खरीखोटी माहिती दिलेली असते. जुन्याजाणत्यांच्या अनुभवांपासून ते मैत्रीपूर्ण सल्ल्यांपर्यंत, केमिस्टकडे मिळणाऱ्या औषधांपेक्षा परिणामकारक असल्याचा दावा करणाऱ्या घरगुती उपचारांपासून ते नैसर्गिक उपचारांपर्यंत साऱ्यांचा भडिमार होताना दिसतो. **(क्रमशः)....**

त्यामुळे आपल्या ममुरुमांफ्वरील उपचारांना सुरुवात

## २ Joke विनोद




गुरूजी : सांग असत्यवादी मोठा की सत्यवादी?

शिष्य : असत्यवादी.

गुरूजी : काहीतरी भलतंच कसं काय?

शिष्य : सत्यवादी चार अक्षरी शब्द आहे. असत्यवादी एका अक्षराने मोठा आहे.

## ३ Message संदेश




Babu apni girlfriend se- darling kal ghar par aa jana koi bhi nahi hoga!
Jab ladki ghar par aati hai to sachmuch koi nahi tha.
Ladka- kya me tumhara hath tham lu?
Ladki – No thanks ! ye itna bhari nahi he!!

## ४ Thought सुविचार



जागृतावस्थेतील व्याधींना निद्रा हेच एकमेव औषध.


**–सर्वेटिस**

**संस्कृत सुभाषित**

**जीवन्तोऽपि मृता: पञ्च व्यासेन परिकीर्तिता: ।**
**दरिद्रो, व्याधितो, मूर्ख:, प्रवासी नित्यसेवक: ॥**

अर्थ : दरिद्री, रोगी, मूर्ख, प्रवासी आणि वेठबिगार कामगार हे पाचजण जिवंत असून मेल्यासारखे आहेत अशी व्यासोक्ती आहे.

## मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. जबरदस्तीची हप्तावसुली
४. उगीच
७. खाळगी, मोठे भोक
९.श्वास, धमकी
१०. अधिक महिना
११. नंतर
१२. शिल्लक राहिलेला कचरा
१३. दया करणारा (परमेश्वर)
१४. जीभ
१५. हत्तीसारख्या डौलदार चालीची
१७. त्रस्त
१९. हळूच
२१. गर्दीची धावाधाव
२३. सूट
२४. हेकट
२५. द्रव्य
२६. अभिनेता
२७. नस्काराचा एक शब्द
३०. पांढरपेशा, नोकरदार
३३. संताप, क्रोध
३४. डोक्यावर दहाचा आकडा मिरवणारा
३५. अंधार
३६. बर्फ
३८. पळसाचा डिंक
३९. महाभारतकाळापासून प्रसिद्ध बर्फाळ पर्वतराजी
४१. देवाण-घेवाण
४३. अरण्य
४५. चांदी
४७. मच्छर, चिलट
५०. भान, समज
५१. नाकारणे
५३. नमनीय
५६. गवगवा
५८. गरजू
६०. रथावर बसलेला
६१. हुक्की, लहर
६२. गर्दीचा विळखा
६३. उन्हाळ्यात दिलासा देणारा पाऊस
६४. हिंदीत सरसरीत मिश्रण
६५. दया
६८. डोळे असणारे फळ
७०. दरवळ
७३. कमी केलेला
७४. उत्तराधिकारी
७५. उमाळा
७६. उडाणटप्पू

### उभे शब्द

१. संरक्षणासाठी खोदलेला चर
२. शंकराजवळचे छोटे चर्मवाद्य
३. कपड्याला लावलेली चुणीदार पट्टी
४. विसराळू
५. इच्छा
६. उबदार पांघरुण (इंग्रेजी)
७. बारीक खड्डा
८. विद्युल्लता
१०. मध
१२. हलव्याचा कंद
१५. गणपतीचे एक नाव
१६. हिंदीत भेसळ
१८. नातेवाईक
१९. अपहार, पैशाचा घोटाळा
२०. मोगऱ्याची माळ
२१. निष्णात
२२. वेतन
२३. घोंगड्या विणणारी जमात
२५. मालक
२८. माझे
२९. थोरवी
३१. खण
३२. माणूस
३३. कौसल्यापुत्र
३४. घाणेरडे पाणी
३७. जखमेवरील स्निग्ध औषध
३८. मिठी
३९. फायदेशीर, कल्याणकारी
४०. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री (नाव)
४२. शेंडीभोवती राखलेले केस
४४. एक लहान गड्डाभाजी
४६. आपले राष्ट्रगीत
४८. रेशमी धोतर
४९. शिक्षा
५०. जाण्याची आज्ञा, मात्र हिंदी गाण्यात असल्यास लाडिकपणे होणारी
५२. मातीचा कण
५४. पाणी
५५. योग्य, समर्पक
५६. ओझे वाहणारे जनावर
५७. उन्हाळ्यात केले जाणारे साठवणीचे पदार्थ
५९. यंत्रातील घर्षण कमी करणारे तेल
६४. चिक्कूसाठी प्रसिद्ध गाव
६५. वाळवी
६६. मेख, रहस्य, मर्म
६७. पत्नी
६८. शेवट, अखेर
६९. नूतन
७०. राहण्याची जागा
७१. झीज, मडके
७२. रोखलेली नजर
७४. जागृत, ठिकाण

### आडवे उत्तर

१.खंडणी ४.विनाकारण ७.खबदाड ९.दम १०.मलमास ११.मग १२.गाळ १३.करुणाकर १४.रसना १५.गजगामिनी १७.बेजार १९.अलगद २१.पळापळ २३.सवलत २४.हट्टी २५.धन २६.नट २७.रामराम ३०.चाकरमानी ३३.राग ३४.नाग ३५.तम ३६.हिम ३८.कमरकस ३९.हिमालय ४१.देवघेव ४३.वन ४५.रजत ४७.मशक ५०.जाणीव ५१.नकार ५३.वंदनीय ५६.गाजावाजा ५८.गरजवंत ६०.रथारूढ ६१.सणक ६२.गराडा ६३.वळीव ६४.घोल ६५.अननस ७०.घमघमाट ७३.वजा ७४.वारसदार ७५.कढ ७६.उंडगा

### उभे उत्तर

१.खंदक २.डमरु ३.झालर ४.विसरभोळा ५.कामना ६.राग ७.खळगा ८.दामिनी १०.मकरंद १२.गजरा २१.पट्टीचा २२.पगार २३.सनगर २५.धनी २८.मम २९.महिमा ३१.कप्पा ३२.मानव ३३.राम ३४.नास-वणी ३७.मलम ३८.कव ३९.हितकारक ४०.यशवंतराव ४२.घेरा ४४.नवलकोल ४६.जनगणमन ४८.कद ४९.सजा ५०.राजा ५२.रज ५४.नीर ५५.यथार्थ ५६.गाढव ५७.वाळवण ५९.वंगण ६४.घोलवड ६५.कसर ६६.गोम ६७.भामा ६८.अस्त ६९.नवा ७०.घर ७१.घट ७२.टक ७४.जागा

## भातांगळी येथे आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते २५ लक्ष रुपये खर्चाच्या सभामंडपाचे भूमिपूजन



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर तालुक्यातील मौजे भातांगळी येथे अखंड हरिनाम सप्ताहातील श्रीमद भागवत कथा ज्ञान यज्ञाच्या समारोप निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरा समोर आमदार निधीतील २५ लक्ष रुपये खर्चाच्या सभा मंडप उभारणी कामाचे भूमिपूजन भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

प्रति वर्षाप्रमाणे याहीवर्षी लातूर तालुक्यातील मौजे भातांगळी येथे २ मार्च ते ९ मार्च दरम्यान विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहाच्या आणि भक्तीमय वातावरणात होत आहे. या सप्ताहात आळंदी येथील हभप श्री जनार्धनदास महाराज यांच्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचा समारोप भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

याप्रसंगी भागवत कथाकार हभप श्री जनार्दन दास महाराज यांचा आ कराड यांनी यथोचित सत्कार करून सन्मान केला. विठ्ठल रुक्मिणी मंदिरासमोर आमदार निधीतून २५ लक्ष रुपये खर्चाच्या सभा मंडप उभारणी कामाचा भूमिपूजन भाजप नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या शुभहस्ते करण्यात आले. भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. आ. कराड यांचे भातागळी गावात आगमन होतात फटाक्याची आतिषबाजी करून ग्रामस्थांनी जोरदार स्वागत केले. भातांगळीचे उपसरपंच मारुती शिंदे यांच्या संपर्क कार्यालयास आ. रमेशअप्पा कराड यांनी सदिच्छा भेट दिली.

यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिल्हा परिषद सदस्य महादेव साळुंके, भाजपाचे मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, महेंद्र गोडभरले, पद्माकर चिंचोलकर, विजयकुमार मलवाडे, पांडुरंग बालवाड, व्यंकटसिंह चव्हाण, आदिनाथ मुळे, नागनाथ ऊटेकर, व्यंकट जटाळ, सुरेखा पुरी, चंद्रकांत पासमे पद्माकर शिंदे, लिंबराज बोळगे, बाबासाहेब इंगळे, केदार ठाकूर, किरण पुरी, सोमनाथ गोकुळे, संतोष पाटील, बापूराव पाटील, आनंत पाटील, महादेव मुचाटे, अहमद शेख, गौरीशंकर गिरवलकर, रावसाहेब पाटील, दिलीप कांबळे, विष्णू कारवाडे, दिलीप मुक्ता यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्ते भाविक भक्त महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## काटगाव तांडा येथील साने गुरुजी आश्रम शाळा येथे राष्ट्र सेवा दलाचे २३ ते २७ एप्रिल दरम्यान नेतृत्व शिबीर

**लातूर/प्रतिनिधी :** लोकशाही समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष, विज्ञानवादी विचाराचे मैदानी प्रशिक्षक आणि बौद्धीक नेतृत्व घडावे, या उद्देशाने लातूर तालुक्यातील काटगाव तांडा येथील साने गुरुजी विद्यालय आश्रमशाळा येथे २३ ते २७ एप्रिल दरम्यान राष्ट्र सेवा दलाच्या वतीने इयत्ता ७ वी ते ९ च्या विद्यार्थ्यांसाठी नेतृत्व विकास शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात लातूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे, शिक्षण संस्था चालक शेषेराव चव्हाण यांनी केले आहे. राष्ट्र सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित शिंदे, कार्याध्यक्ष अंकुश गायकवाड, डॉ. शिवाजी जवळगेकर, जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे, डॉ. गणेश गोमारे, शेषेराव चव्हाण, माधव बावगे, उत्रेश्र्वर बिराजदार आदींच्या उपस्थित झालेल्या बैठकीत सदरच्या सेवा दल शिबिरावर शिक्का मोर्तब करण्यात आले. या शिबिरात मुला-मुलींच्या शारीरिक, मानसिक आणि बौद्धीक विकासावर भर देण्यात येणार आहे. त्यासाठी पुणे मध्यवर्ती कार्यालयाकडून आणि आपलं घर येथून प्रशिक्षक येणार आहेत. तसेच प्रा. नागोराव कुंभार, प्रा. सोमनाथ रोडे, माधव बावगे, प्रा. अर्जुन जाधव, प्रा. डॉ. शिवाजीराव जवळगेकर, सुभाष भिंगे, अशोक गोविंदपूरकर, संपादक सूर्यप्रकाश धूत, जयप्रकाश दगडे, शिवाजीराव नरहरे, धर्मराज हल्लाळे, शिवाजीराव शिंदे, सुपर्ण जगताप, शरद झरे, प्रा. दत्ता सोमवंशी, श्याम जैन, प्रा. अशोक नरनवरे, प्रा. सुशीला पिंपळे, सुनंदा जगताप, संदीपान बडगिरे, हरिदास तंमेवार, डॉ. नीलम पन्हाळे, दिंगबर बुरस्पट्टे, रुकसाना मुल्ला,रामकुमार रायवाडीकर यांच्यासह इतर प्रख्यात मन्यवारांची बौद्धीके होणार आहेत. शिबिरार्थीसाठी निवास व भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

## नियमबाह्य भाडेकरू मुळे प्रवाशांना त्रास



**निलंगा/प्रतिनिधी:** येथील बसस्थानक मध्ये रसवंतीगृह ला चुकिचा पद्धतीने जागा देऊन एस टी महामंडळ निलंगा आगार प्रशासनाने एका प्रकारे प्रवासी वर्गाला त्रास देण्याचा घाट घातला असून ते रसवंती गृह त्वरित स्थलांतर करावे अशी मागणी शिवसेना महिला तालुका प्रमुख दैवता सगर ,रेखा पुजारी उपजिल्हाप्रमुख,बबीता कोरके शहर प्रमुख यांनी निलंगा आगार प्रमुखाकडे लेखी तक्रार देऊन केली आहे. जुन्या बसस्थानक मध्ये नियम डावलून भिंत पाडुन रसवंती गृह ला जगा देण्यात आली आहे.मुळात परवाना मोकळ्या जागेवर असताना जुन्या बसस्थानक च्या छताखाली कुणाच्या आदेशानुसार ही जागा देण्यात आली याची चौकशी करून संबंधितावर कारवाई करण्यात यावी अशीही मागणी करण्यात आली आहे. रसवंती गृह त्वरित स्थलांतर करून वाहतूक व प्रवासी वर्गाला जाणारा त्रास दूर करावा अशी मागणी केली आहे....

### टाटा मोटर्स फाउंडेशन, क्रिएटिव्ह फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने

# जलसमृद्ध अभियानाचा शुभारंभ सोमवारी फत्तेपूर येथे आमदार अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी व सीईओ यांच्या उपस्थितीत

**औसा/प्रतिनिधी :** औसा मतदारसंघात ग्रामीण विकासाला गती देण्यासाठी टाटा मोटर्स फाउंडेशन, क्रिएटिव्ह फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने एकात्मिक ग्रामविकास प्रकल्पांतर्गत सात ग्रामपंचायतींमध्ये पायलट प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रकल्पामध्ये आरोग्य, शिक्षण, शेती, पाणी व्यवस्थापन आणि कौशल्य विकास अशा विविध घटकांवर एकत्रितपणे काम केले जाणार आहे.

गेल्या दोन महिन्यांपासून या प्रकल्पाच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली असून, गावनिहाय कुटुंब सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणातून प्रत्येक कुटुंबाच्या गरजा ओळखून पुढील तीन वर्षांसाठी सविस्तर नियोजन करण्यात येत आहे. या काळात शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रावर विशेष भर देत सर्वांगीण विकास साधण्याचे उद्दिष्ट आहे.यासंदर्भात औसा पंचायत समितीत




शुक्रवारी बैठक पार पडली. या बैठकीस आमदार अभिमन्यू पवार, टाटा मोटर्स फाऊंडेशनचे शैलेश पाटील, पंचायत समिती सभापती गंगाबाई कोदळीकर, उपसभापती अमोल पाटील, गटविकास अधिकारी आनंदकुमार मिरगणे, सौ. शोभा अभिमन्यू पवार तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.महाराष्ट्र शासनामार्फत २०१७ पासून सुरू असलेला हा प्रकल्प सुरुवातीला पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागात राबविण्यात आला होता. त्यानंतर राज्यातील १५ आकांक्षित तालुक्यांमध्ये त्याचा विस्तार करण्यात आला असून सध्या ८२ ग्रामपंचायतींमध्ये हा प्रकल्प सुरू आहे.

औसा तालुका मूळ यादीत नसतानाही आमदार पवार यांच्या प्रयत्नांमुळे सात ग्रामपंचायतींमध्ये हा पायलट प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे.यावेळी बोलताना आमदार पवार म्हणाले की, स्वयंपूर्ण मतदारसंघ घडविण्याच्या उद्देशाने विविध विकासकामे राबवली जात आहेत. बेलकुंड येथे निम्न तेरणा धरणातून बंद पाईपद्वारे सिंचन उपसा योजना राबवली जाणार असून यामुळे १५ ते १७ गावे हरित होतील.तसेच, तावरजा प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरावा यासाठी नागझरी येथून वाहून जाणारे पाणी वळवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून जलसाठा वाढवून पाण्याचा प्रश्र्न कायमस्वरूपी सोडवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.याशिवाय, सुमारे ६० गावांमध्ये नालीकरण, सरळीकरण आणि खोलीकरणाची कामे हाती घेतली जाणार असून त्यामुळे भविष्यात पाण्याची मुबलक उपलब्धता सुनिश्र्चित होणार आहे.औसा मतदारसंघात ग्रामीण विकासाला गती देण्यासाठी टाटा मोटर्स फाउंडेशन, क्रिएट फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने एकात्मिक ग्रामविकास प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात तांबरवाडी,दावतपूर फत्तेपूर, पारधेवाडी या ठिकाणी हा प्रकल्प राबविला जाणार आहे अशी माहिती यावेळी आमदार आमदार अभिमन्यू पवार यांनी दिली.

या प्रकल्पाचा शुभारंभ सोमवारी फत्तेपूर येथे होणार असून, कार्यक्रमास जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड , जिल्हा परिषद सीईओ राहुल कुमार मीना आणि आमदार अभिमन्यू पवार उपस्थित राहणार आहेत.एकात्मिक ग्रामविकास प्रकल्पामुळे औसा तालुक्यातील ग्रामीण भागात पाणी, शेती, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात मोठा बदल घडून येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात विनामूल्य अकरावी केंद्रीय ऑनलाईन प्रवेशासाठी विद्यार्थी आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**लातूर/प्रतिनिधी :** शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या परिपत्रकाद्वारे शैक्षणिक सत्र २०२६-२७ इयत्ता अकरावी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा भाग १ भरण्याची विनामूल्य सुविधा आणि मार्गदर्शन कक्षाची महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात निर्मिती करण्यात आली आहे. याला विद्यार्थी आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे, मुख्य समन्वयक प्रो.डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, उपप्राचार्य प्रा.नितीन वाणी आणि बोर्ड समन्वयक डॉ.गुणवंत बिरादार, प्रा.नीता दलगडे, नरेश वाडकर, ओमकार बोळशेट्टी, अनिल कोळळे, शुभम बिराजदार, रोहन वेडे व पालक विद्यार्थी उपस्थित होते.

शुक्रवार दि. १० एप्रिल २०२६ पासून दररोज स.१० ते दुपारी २ वा. आणि दुपारी ३ ते ५ या वेळेमध्ये महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयातील सीईटी सेल विभागामध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

या सुवर्ण संधीचा लाभ एसएससी बोर्ड परीक्षा दिलेल्या विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे, मुख्य समन्वयक प्रो.डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, उपप्राचार्य प्रा.नितीन वाणी आणि बोर्ड समन्वयक डॉ.गुणवंत बिरादार यांनी केले आहे.

## उन्हाळी सुट्ट्यांमध्ये रेल्वेकडून पंढरपूर-तिरुपती, बंगळुरू कॅन्टोनमेंट-कलबुरगि आणि SMVT बंगळुरू-बीदर या विशेष गाड्यांची सेवा सुरूच राहणार

**सोलापूर/प्रतिनिधी :** प्रवाशांच्या मागणीनुसार, उन्हाळी सुट्ट्यांमध्ये प्रवाशांची होणारी अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन, रेल्वे प्रशासनाकडून पंढरपूर-तिरुपती, बंगळुरू कॅन्टोनमेंट-कलबुरगि आणि डचतढ बंगळुरू-बीदर या विशेष गाड्यांची सेवा पुढेही सुरू ठेवण्यात येणार आहे. या संदर्भातील तपशील खालीलप्रमाणे आहेत:



पंढरपूर-तिरुपती साप्ताहिक विशेष गाड्या (२ फेऱ्या)
- गाडी क्रमांक ०७०१२ तिरुपती-पंढरपूर साप्ताहिक विशेष गाडी, जी ०४.०४.२०२६ पर्यंत धावणार असल्याचे अधिसूचित करण्यात आली होती, ती आता दर शनिवारी ११.०४.२०२६ पर्यंत धावणार आहे. (१ फेरी)
- गाडी क्रमांक ०७०३२ पंढरपूर-तिरुपती विशेष गाडी, जी ०५.०४.२०२६ पर्यंत धावणार असल्याचे अधिसूचित करण्यात आली होती, ती आता दर रविवारी १२.०४.२०२६ पर्यंत धावणार आहे. (१ फेरी)

बंगळुरू कॅन्टोनमेंट-कलबुरगि साप्ताहिक विशेष गाड्या (६ फेऱ्या)
- गाडी क्रमांक ०६२०७ बंगळुरू कॅन्टोनमेंट-कलबुरगि साप्ताहिक विशेष गाडी, जी २८.०३.२०२६ पर्यंत धावणार असल्याचे अधिसूचित करण्यात आली होती, ती आता दर शनिवारी २५.०४.२०२६ पर्यंत धावणार आहे. (३ फेऱ्या)
- गाडी क्रमांक ०६२०८ कलबुरगि-बंगळुरू कॅन्टोनमेंट साप्ताहिक विशेष गाडी, जी २९.०३.२०२६ पर्यंत धावणार असल्याचे अधिसूचित करण्यात आली होती, ती आता दर रविवारी २६.०४.२०२६ पर्यंत धावणार आहे. (३ फेऱ्या)

SMVT बंगळुरू-बीदर द्विसाप्ताहिक विशेष गाड्या (१२ फेऱ्या)
- गाडी क्रमांक ०६५३९ डचतढ बंगळुरू-बीदर द्विसाप्ताहिक विशेष गाडी, जी २९.०३.२०२६ पर्यंत धावणार असल्याचे अधिसूचित करण्यात आली होती, ती आता २६.०४.२०२६ पर्यंत दर शुक्रवार आणि रविवारी पर्यंत धावणार आहे . (६ फेऱ्या)
- आलेली गाडी क्रमांक ०६५४० बीदर-SMVT बंगळुरू द्विसाप्ताहिक विशेष गाडी ही दिनांक ३०.०३.२०२६ पर्यंत धावण्यासाठी अधिसूचित करण्यात आली होती. ती आता २७.०४.२०२६ पर्यंत दर शनिवार आणि सोमवारी धावणार आहे. (६ फेऱ्या)

उपर्युक्त गाड्यांच्या रचनेत (कोच संरचना) आणि थांब्यांमध्ये कोणताही बदल होणार नाही.

आरक्षण आणि बुकिंग: विशेष शुल्कासह धावणाऱ्या या विशेष गाड्यांच्या विस्तारित फेऱ्यांसाठीचे आरक्षण सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध असेल. आरक्षण नसलेल्या डब्यांसाठीचे बुकिंग स्थानकांवरील बुकिंग खिडक्यांवरून, तसेच 'RailOne App' द्वारे देखील करता येईल. प्रवाशांना विनंती करण्यात येते की, कोणत्याही गैरसोयीपासून वाचण्यासाठी त्यांनी वैध तिकिटासहच प्रवास करावा.

या विशेष गाड्यांच्या विविध थांब्यांवरील सविस्तर वेळापत्रकासाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या, किंवा 'RailOneApp' अथवा 'NTES App' डाउनलोड करा.

## सोलापूर विभागाने डॉ.कोटणीस स्मृती रेल्वे रुग्णालयात मध्य रेल्वेचा औषधनिर्मात्यांसाठीचा 'सातत्यपूर्ण वैद्यकीय शिक्षण' (CME) कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित केला

**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने १० एप्रिल २०२६ रोजी सोलापूर येथील डॉ. कोटणीस स्मृती रेल्वे रुग्णालयात औषधनिर्मात्यांसाठी (Pharmacists) विभागीय स्तरावरील 'सातत्यपूर्ण वैद्यकीय शिक्षण' (CME) कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाची मध्यवर्ती संकल्पना औषधनिर्मात्यांचे सक्षमीकरण: सुरक्षित औषध वितरण, स्मार्ट तंत्रज्ञान आणि रुग्णांचे उत्तम आरोग्य परिणाम अशी होती. या संकल्पनेद्वारे आधुनिक आरोग्यसेवा प्रणालीमध्ये औषधनिर्मात्यांची बदलती भूमिका अधोरेखित करण्यात आली; तसेच रुग्णांची सुरक्षा, तंत्रज्ञानाचा वापर आणि आरोग्यसेवेच्या वितरणातील सुधारणा या बाबींवर विशेष भर देण्यात आला.

या कार्यक्रमात मध्य रेल्वेच्या मुंबई, नागपूर, पुणे, भुसावळ आणि सोलापूर या सर्व विभागांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वैद्यकीय अधिकारी आणि औषधनिर्मात्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग घेतला. आरोग्यसेवेतील उत्कृष्टता आणि सततच्या व्यावसायिक विकासाप्रती असलेली त्यांची दृढ बांधिलकी यातून दिसून आली. प्रमुख मुख्य वैद्यकीय संचालक (PCMD) डॉ. ममता शर्मा यांनी या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहून शोभा वाढवली. मुख्य आरोग्य संचालक (CHD) डॉ. सुषमा माटे आणि विविध विभागांचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक (CMS) हे देखील याप्रसंगी उपस्थित होते.

वैद्यकीय आणि औषधनिर्माण क्षेत्रातील विविध विषयांवर या कार्यक्रमात अनेक ज्ञानवर्धक व्याख्याने देण्यात आली, ज्यामुळे सहभागींच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या आणि त्यांच्या व्यावसायिक कौशल्यांमध्ये भर पडली. सोलापूर येथील 'चखढ विश्र्वप्रयाग विद्यापीठा'च्या प्र-कुलगुरू (Pro Vice Chancellor)




आणि प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ डॉ. विद्या निरंजन यांना या कार्यक्रमात अतिथी व्याख्यात्या म्हणून आमंत्रित करण्यात आले होते; त्यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनामुळे या कार्यक्रमाची गुणवत्ता आणि महत्त्व लक्षणीयरीत्या वाढले.


या CME कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन सोलापूर विभागाचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक (CMS) डॉ. मंजुनाथ जी.एस. यांच्या नेतृत्वाखालील पथकामुळे शक्य झाले. यामध्ये डॉक्टर, औषधनिर्माते आणि निम-वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे (Paramedical staff) सक्रिय सहकार्य आणि पाठिंबा लाभला. हा उपक्रम मध्य रेल्वेची आरोग्यसेवा बळकट करण्याप्रती असलेली बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित करतो. सततचे शिक्षण, सर्वोत्तम कार्यपद्धतींचा अवलंब आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांची क्षमतावृद्धी या माध्यमातून आरोग्यसेवा सुधारून, अंतिमतः रुग्णांना अधिक चांगली काळजी आणि उत्तम आरोग्य परिणाम मिळतील याची खात्री यातून दिली जाते.

## एकात्मिक कीड व्यवस्थापनाचे धडे मिळणार;१५ एप्रिल रोजी 'डिजिटल शेती शाळा' उपक्रमाचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :**हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जात शेतीला अधिक शाश्र्वत आणि समृद्ध करण्याच्या उद्देशाने कृषी विभाग महाराष्ट्र राज्य, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प आणि पाणी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने १५ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ७:३० वाजता 'डिजिटल शेती शाळा भाग-३' चे आयोजन करण्यात आले आहे. या सत्रात प्रामुख्याने 'एकात्मिक कीड व्यवस्थापन' या विषयावर सखोल मार्गदर्शन करण्यात येणार असून, यामध्ये सापळा पिकांची लागवड, जैविक व नैसर्गिक कीड व्यवस्थापन, शेतात पक्षी थांबे उभारणे, चिकट सापळ्यांचा वापर आणि मित्र कीटकांचे संवर्धन यांसारख्या प्रगत तंत्रज्ञानाची माहिती दिली जाणार आहे.

या तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष शेतीत योग्य वापर कसा करावा, याबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळणार असल्याने सर्व शेतकरी बंधू-भगिनी, शेतकरी गट, एफपीओ आणि महिला बचत गटांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अधिक माहितीसाठी आपल्या भागातील सहाय्यक कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, समूह सहाय्यक किंवा कृषी ताई व कृषी सखी यांच्याशी संपर्क साधावा. जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी या विशेष डिजिटल शेती शाळेत सहभागी होण्याचे आवाहन लातूरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# सामाजिक समता सप्ताहाअंतर्गत ११ एप्रिल रोजी ज्येष्ठांसाठी आरोग्य शिबिर

## लाभ घेण्याचे समाज कल्याणचे आवाहन

धाराशिव, (जिमाका) –सामाजिक न्याय,आर्थिक व सामाजिक संरक्षण उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकार सातत्याने प्रयत्नशील आहे.त्यानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व वंचित–दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत.या योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचावी तसेच समाजात व्यापक जनजागृती निर्माण व्हावी,या उद्देशाने दरवर्षी ८ ते १४ एप्रिल या कालावधीत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यात येतो.

या पार्श्वभूमीवर ११ एप्रिल २०२६ रोजी ज्येष्ठ नागरिकांसाठी वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.यासोबतच विशेष कार्य केलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा तसेच ज्येष्ठांसाठी कार्य करणाऱ्या बिगर शासकीय संस्थांचा सत्कार व गौरवही करण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम ११ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,धाराशिव येथे होणार असून,जिल्ह्यातील सर्व ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त सचिन कवले यांनी केले आहे.

# धाराशिव राजकीय भूकंप! काँग्रेसला मोठा धक्का, प्रभावी नगरसेवकांचा भाजपमध्ये प्रवेश

**धाराशिव (शेख अंजुम)** – मुंबईच्या राजकारणात मोठी उलथापालथ घडवणारी घटना समोर आली असून काँग्रेस आय पक्षाला जबरदस्त धक्का बसला आहे. शहरातील प्रभावी आणि जनाधार असलेले नगरसेवक सिद्धार्थ दादा बनसोडे आणि अक्षय जोगदंड यांनी अखेर भारतीय जनता पक्षात (भाजप) प्रवेश करून राजकीय वर्तुळात खळबळ उडवली आहे.

हा पक्षप्रवेश सोहळा अत्यंत उत्साहात आणि मोठ्या दिमाखात पार पडला. आमदार रणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते हा प्रवेश पार पडला. यावेळी कार्यकर्त्यांची मोठी गर्दी आणि उत्साह पाहायला मिळाला.

**स्थानिक राजकारणात मोठा गेमचेंजर**

सिद्धार्थ बनसोडे आणि अक्षय जोगदंड हे दोघेही स्थानिक पातळीवर मजबूत पकड असलेले नेते मानले जातात. त्यांच्या भाजप प्रवेशामुळे मुंबईतील अनेक प्रभागांमध्ये राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भाजपला स्थानिक स्तरावर मोठे बळ मिळणार असून आगामी निवडणुकांमध्ये याचा थेट परिणाम होण्याची चर्चा रंगली आहे.

**मान्यवरांची दमदार उपस्थिती**

या सोहळ्यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. यामध्ये: शहर प्रमुख अमित शिंदे, नगरसेवक राहुल काकडे, माजी नगरसेवक दत्ता पेठे, यांनी उपस्थित राहून नव्या सदस्यांचे स्वागत केले आणि पक्ष संघटन अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त केला.

**नेत्यांची प्रतिक्रिया**

पक्षप्रवेशानंतर बोलताना नव्याने भाजपमध्ये प्रवेश केलेल्या नेत्यांनी सांगितले की, विकासकामांना गती देण्यासाठी आणि जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी भाजपमध्ये प्रवेश केला. आगामी काळात अधिक जोमाने काम करू.

त्याचबरोबर भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनीही या प्रवेशाचे स्वागत करत सांगितले की, ही सुरुवात आहे, आगामी काळात आणखी अनेक नेते भाजपमध्ये येतील.

**जनतेमध्ये चर्चेचा विषय**

या घटनेनंतर स्थानिक नागरिकांमध्ये जोरदार चर्चा रंगली आहे. काही नागरिकांनी विकासाच्या दृष्टीने हा निर्णय योग्य असल्याचे म्हटले, तर काहींनी याला राजकीय स्वार्थ असेही संबोधले. मात्र एकूणच हा पक्षप्रवेश आगामी राजकारणात निर्णायक ठरणार हे स्पष्ट झाले आहे.

**आगामी निवडणुकांवर परिणाम?**

राजकीय विश्लेषकांच्या मते, हा पक्षप्रवेश आगामी महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये गेमचेंजर ठरू शकतो. भाजपची ताकद वाढण्याची शक्यता असून काँग्रेससाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

# उन्हाळ्यात जार पाण्याची वाढती मागणी; गुणवत्ता तपासणे का ठरतेय अत्यावश्यक?



धाराशिव प्रतिनिधी! –सध्या प्रचंड उन्हाळ्यामुळे थंड पाण्याची गरज वाढली असून शहरात आणि ग्रामीण भागात जारच्या पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. मात्र, केवळ थंड पाणी मिळते म्हणून जारचे पाणी वापरणे धोकादायक ठरू शकते. पाण्याची गुणवत्ता तपासणे आता अत्यावश्यक बनले आहे. अनेक ठिकाणी पाणी शुद्धीकरणाची प्रक्रिया (ठज/णत) योग्य पद्धतीने केली जाते का, याबाबत शंका व्यक्त केली जात आहे. काही विक्रेते केवळ साधे फिल्टर करून किंवा जुन्या जारमध्ये पाणी भरून विक्री करत असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत. त्यामुळे हे पाणी शंभर टक्के सुरक्षित आहे का, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.आरोग्य तज्ज्ञांच्या मते, दूषित किंवा अपूर्णपणे फिल्टर केलेले पाणी पिण्यामुळे पोटाचे विकार, जुलाब, टायफॉइड, पिवळ्या काविळीसारखे आजार होऊ शकतात. विशेषतः उन्हाळ्यात अशा आजारांचा धोका अधिक वाढतो.

**नागरिकांनी घ्यावयाची काळजी :**

फक्त नोंदणीकृत व विश्वासार्ह पुरवठादारांकडूनच जार पाणी घ्यावे

जारवरील सील, उत्पादन तारीख आणि ब्रँड तपासावा जार स्वच्छ आहे का, आत घाण किंवा कण दिसत नाहीत ना याची खात्री करावी पाण्याची चव, वास वेगळा वाटल्यास त्वरित वापर थांबवावा.

दरम्यान, प्रशासनानेही जार पाणी विक्रेत्यांवर नियमित तपासणी मोहीम राबवून निकृष्ट दर्जाचे पाणी विकणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

उन्हाळ्यात शरीराला पाणी आवश्यक असले तरी ते सुरक्षित आणि शुद्ध असणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे थंड आहे एवढ्यावर न थांबता शुद्ध आहे का? हे तपासणे आता काळाची गरज बनली आहे.

# अफवा की राजकीय षडयंत्र? ओमराजे निंबाळकर प्रकरणाची केवळ चर्चाच! बाकी काही नाही

धाराशिव (शेख अंजुम) जिल्ह्याच्या राजकारणात सध्या एकच नाव चर्चेत आहे ती लोकप्रिय खासदार ओमराजे निंबाळकर यांची... अचानक काही माध्यमे, सोशल मीडिया पोस्ट आणि राजकीय गटांमधून अशी चर्चा सुरू झाली की, ते पक्षातून बाहेर पडून दुसऱ्या गटात जाण्याच्या तयारीत आहेत.

ही चर्चा इतक्या वेगाने पसरली की कार्यकर्त्यांपासून ते सर्वसामान्य जनतेपर्यंत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले.

**थेट स्पष्टीकरण – मी पक्ष सोडलेला नाही!**

या सर्व चर्चांना पूर्णविराम देत स्वतः खा. ओमराजे निंबाळकर यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, माझा कोणत्याही पक्षाशी संपर्क नाही. मी माझ्या पक्षासोबत ठाम आहे. या केवळ अफवा व जाणीवपूर्वक पसरवलेले षडयंत्र असल्याचा इशाराही दिला.

**षडयंत्राचा संशय – कोणाचा गेम?**

राजकीय वर्तुळात अशाही शक्यता चर्चेत आहेत की, विरोधकांकडून नेतृत्व डळमळीत दाखवण्याचा प्रयत्न असू शकतो, स्थानिक पातळीवर गोंधळ आणि अस्थिरता निर्माण करण्याची रणनीतीचा संशय येत असल्याचे दिसून येत असल्याचे दिसून येत आहे.

आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मानसिक दबाव टाकण्याची खेळीअसल्याची चर्चा आहे. ऑपरेशनच्या नावाखाली अनेक अफवा पसरवून वातावरण तापवण्याचे प्रयत्न होत आहेत. यामुळे कार्यकर्त्यांमध्ये एकप्रकारे एकजूट अधिक मजबूत झाल्याचे दिसत आहे.

**जनतेची भावना – राजकारण नको, विकास हवा!**

या संपूर्ण प्रकरणात सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जनतेची प्रतिक्रिया असून लोकांना अफवा आणि राजकीय खेळांचा कंटाळा आला आहे. रस्ते, पाणी, रोजगार, शेती या प्रश्नांवर लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे. जनताच आता अफवा बंद करा, काम सुरू करा! असे म्हणत आहे. अफवांना ऊत येत असल्याचे दिसून येत आहे.

# 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)– शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.०९ एप्रिल रोजी मोटार वाहन कायदा–नियम भंग प्रकरणी एकुण ३०८ कारवाया करुन २,६१,८०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

# प्रा.डॉ.मारुती लोंढे यांचा कनिष्ठ विभागाकडून सत्कार



धाराशिव (शीला उंबरे–पेंढरकर)– येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाकडून डॉ. मारुती लोंढे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरची अर्थशास्त्र विषयातून पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाल्याबद्दल कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री बबन सूर्यवंशी, राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. सुनील मोहिते, प्रा.सचिन चव्हाण,साहित्यिक डॉ.अरविंद हंगरगेकर , आदीनी त्यांचा सत्कार केला. यावेळी कनिष्ठ विभागातील गुरुदेव कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी प्रा. सुनील मोहिते म्हणाले की, डॉ. मारुती लोंढे यांनी अनेक पुस्तकांचे लेखन केलेले आहे.शैक्षणिक क्षेत्रामध्ये खुप मोठी भरारी घेतलेली आहे. यापुढे देखील त्यांची अशीच प्रगती व्हावी यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपप्राचार्य प्रा. सुर्यवंशी यांनी देखील अभिनंदन करून भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

डॉ.मारुती लोंढे यांनी सत्काराबध्दल सर्वांचे आभार मानले.

# ११ एप्रिल ते २० एप्रिल, एमएचटी–सीईटी परीक्षा कडेकोट बंदोबस्त ; केंद्र परिसरात कलम १६३ लागू

धाराशिव (जिमाका.) एमएचटी–सीईटी २०२६ ही परीक्षा दि.११ एप्रिल ते २० एप्रिल २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली असून, परीक्षेच्या पार्श्वभूमीवर शासकीय तंत्रनिकेतन,धाराशिव तसेच तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट अभियांत्रिकी महाविद्यालय,सोलापूर रोड, धाराशिव या परीक्षा केंद्रांच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू करण्यात आले आहे.परीक्षार्थींना कोणताही अडथळा निर्माण होऊ नये व परीक्षा सुरळीत पार पडावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी यांनी हा प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.

ही परीक्षा दररोज सकाळी ७.३० ते दुपारी १२ व दुपारी १२.३० ते सायंकाळी ६.४५ या वेळेत होणार आहे.परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात बाह्य उपद्रव टाळण्यासाठी व गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी विविध निर्बंध लागू करण्यात आले आहेत.

आदेशानुसार,परीक्षा केंद्राच्या परिसरात कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यास मनाई करण्यात आली आहे.तसेच शांततेस बाधा निर्माण होईल असे कोणतेही कृत्य करण्यास बंदी घालण्यात आली आहे.केंद्राच्या १०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर,पानपट्टी, टायपिंग सेंटर,एसटीडी बूथ,इंटरनेट कॅफे, कॉम्प्युटर सेंटर्स आदी सेवा परीक्षा कालावधीत बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

याशिवाय,मोबाईल फोन,सेल्युलर फोन,फॅक्स, ई–मेल व इतर प्रसार माध्यमे परीक्षा केंद्रात घेऊन जाण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.कोणत्याही वाहनांना केंद्र परिसरात प्रवेश दिला जाणार नाही. परीक्षेशी संबंधित नसलेल्या व्यक्तींना तसेच परीक्षार्थ्यांच्या नातेवाईकांनाही प्रवेश नसेल. तसेच परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र येण्यास बंदी घालण्यात आली आहे. केवळ परीक्षेशी संबंधित अधिकारी, कर्मचारी, शासकीय अधिकारी, शिक्षक व परीक्षार्थी यांनाच केंद्रात प्रवेश दिला जाणार आहे. हे आदेश दि.११ ते २० एप्रिल २०२६ या कालावधीत दररोज सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत लागू राहतील.आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय न्याय संहिता कलम २२३ नुसार गुन्हा नोंदवून फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

# धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२–२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२–२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२–२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२–२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२–२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२–२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२–२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२–२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२–२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२–२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२–२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१–२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२–२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२–२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२–२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२–२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२–२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२–२२४१८४

# आलियाबाद येथे राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान पौष्टिक तृणधान्य अंतर्गत शेतकऱ्यांना औषधाचे वाटप



(विजय पिसे)–तुळजापूर तालुक्यातील आलियाबाद येथे राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान पौष्टिक तृणधान्य अंतर्गत शेतकऱ्यांना औषध वाटप करण्यात आले. आलियाबाद हे गाव पोखरा अंतर्गत असल्यामुळे येथे शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत.या अगोदर शेतकऱ्यांना बियाणे वाटप करण्यात आले होते.

यानतंर औषधे व फवारणी कीट जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रकाश चव्हाण यांच्या हस्ते वाटप करण्यात आले . यावेळी शेतकरी बाबुराव चव्हाण, पांडुरंग चव्हाण,निजामोदीन काझी,नेमिनाथ चव्हाण, महादेव राठोड,शिवाजी चव्हाण,वाय.के. चव्हाण, गणेश चव्हाण, व्यंकट राठोड, सुनील राठोड, संतोष राठोड,विजय चव्हाण, तानाजी राठोड, सतिश राठोड,हरीदास चव्हाण, संदीप राठोड, सन्नी चव्हाण,बंन्टी पवार, मनोज पवार, कृषी सहायक एस,आर. माने उपस्थित होते.

# अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

भुम(प्रतिनिधी)– पोलीस ठाणे: अंतर्गत अभिजीत रा.साईनाथ गोळी सेंटर रा. शिवशंकर नगर भुम ता. भुम जि. धाराशिव यांनी दि.०९.०४.२०२६ रोजी १४.१० वा. सु.साईनाथ गोळी सेंटर या दुकानात भुम ता. भुम येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ रजनिगंधा मसाला, बाबा पानमसाला, आर एमडी पानमसाला, के आर १००० गुटखा, विमल पान मसाला, व्ही–१ टोबॅको, प्रिमियम शॉट सुगंधीत तंबाखु, सेंन्टेड टोबॅको, तंबाखु, रत्ना छापत तंबाखु, बाबा १२० सुगंधीत तंबाखु असा एकुण १९,३२० किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला भुम पो ठाचे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या. सं. कलम–१२३, २७४, २७५ सह अन्न सुरक्षा मानके अधिनियम कलम २६(२)(ळ), २६(२)(ळीं), २७ (३)(डी), २७ (३)(इ) अन्वये भुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649